१७

Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

पत्ता :- बस स्टॅंड समोर,जळगांव -425001, OFFICE PHONE -Fax-0257-2220511

Email ID:-spjalgaon@mahapolice.gov.in

# प्रसिद्धीपत्रक

## जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२४-२५

## अंतिम निवड/प्रतिक्षा यादीबाबत

## -: उमेदवारांसाठी सूचना:-

१) जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२४-२०२५ च्या जाहिरातीत दर्शविल्याप्रमाणे १७१ रिक्त पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असुन सदर पोलीस भरती मधील शारीरीक चाचणी/लेखी परीक्षा/एनसीसी-सी प्रमाणपत्राच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहुन सामाजिक / समांतर आरक्षण प्रवर्गनिहाय उमेदवारांची तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी दिनांक १९/०३/२०२६ रोजी जळगांव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२) जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२४-२०२५ च्या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना दिनांक २५/०३/२०२६ रोजी कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आले होते. त्याअनुषंगाने कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहीलेल्या उमेदवारांनी मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्रे या कार्यालयास सादर केलेली आहेत.

३) जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२४-२०२५ च्या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०२६ रोजी जळगांव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली तात्पुरत्या निवडयादीतील उमेदवारांनी सादर केलेली सामाजिक आरक्षण / समांतर आरक्षण / इ. आवश्यक ती कागदपत्रे संबधित विभागाकडून पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.

४) **जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती निवड मंडळ-२०२४-२०२५ यांनी दिनांक १९/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादी ही सामाजिक आरक्षण /समांतर आरक्षण/ इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहुन अंतिम करण्यात येत आहे.**

५) वरीलप्रमाणे जळगावं जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०२४-२०२५ च्या अनुषंगाने अंतिम निवड करण्यात येत असलेल्या उमेदवारांनी पोलीस शिपाई पदाच्या जाहिरातीमधील महत्वाच्या सूचना व अटींच्या अनुषंगाने शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास संबधित उमेदवारांची झालेली निवड रद्द करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

६) **पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान उपरोक्त मुद्द्यांप्रमाणे अथवा न्यायोचित बदल / रद्द / सुधारणा करण्याचे अधिकार पोलीस भरती निवडमंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.**

**स्थळ:- पोलीस अधीक्षक, कार्यालय जळगांव**
**दिनांक:- ०५/०५/२०२६**

पोलीस अधीक्षक कार्यालय जळगांव

(श्रीकांत धिवरे)
पोलीस अधीक्षक, जळगांव
तथा अध्यक्ष पो.शि.भरती-२०२४-२५ निवड मंडळ

Scanned with OKEN Scanner